# मिरा भाईंदर महानगरपालिका

## आयुक्त कार्यालय

मुख्यालय, २रा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

दूरध्वनी क्र.०२२-२८१९२८२८ ई-मेल आयडी commissioner@mbmc.gov.in


जा.क्र. मनपा/ आयुक्त / ५८ /२०२५-२६ दि. २२/०९/२०२५

**परिपत्रक**

**विषय:-** प्रशिक्षण अहवाल सादर करणे.

शासनाच्या विविध योजना, अभियाने तसेच महापालिका विकास कामे, कार्यालयीन कामकाजाच्या अनुषंगाने शासनामार्फत, तसेच विविध शासकीय/अशासकीय प्रशिक्षण संस्थांमार्फत प्रशिक्षण/कार्यशाळा/व्याख्याने/प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येत असते. सदर बाबींचा मुळ उद्देश महापालिकेच्या दैनंदिन कामकाजात आधुनिक पध्दती/तंत्रज्ञानाचा वापर करुन कामकाज अधिक प्रभावी, लोकोपयोगी आणि विकासाभिमुख करणे.

सदरचे प्रशिक्षण/कार्यशाळा/व्याख्याने/प्रदर्शन यासाठी उपस्थित राहिल्यानंतर अधिकाऱ्यांनी सविस्तर प्रशिक्षण अहवाल सादर करणे अभिप्रेत आहे. जेणेकरुन महापालिका कामकाज प्रभावी करण्यासाठी त्याचा अवलंब करता येईल.

त्यानुसार यापुढे प्रशिक्षण/कार्यशाळा/व्याख्याने/प्रदर्शन आदीसाठी उपस्थित राहिल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी सविस्तर प्रशिक्षण अहवाल आयुक्तांस सादर करावा. प्रशिक्षण अहवालात खालील बाबींचा प्रामुख्याने समावेश असावा.

१. प्रशिक्षणाची पार्श्वभूमी, उद्देश आणि व्याप्ती.
२. प्रशिक्षणातील निष्कर्ष /विश्लेषण.
३. प्रशिक्षणाचे फायदे आणि पालिका कामकाजासाठीचा अवलंब व अनुपालन

सदर आदेशाची काटेकोर अंमलबजावणी होईल याची खबरदारी घ्यावी.

**(राधाबिनोद अ. शर्मा**, भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रति,**

1) खाते प्रमुख/विभाग प्रमुख (सर्व)
२) स्थळ प्रत.